# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
## प्रसिध्दी पत्रक

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात गेल्या काही दिवसांपूर्वी दोन इमारती कोसळून दुर्घटना घडलेली आहे. शहरात पुनश्च: अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रशासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यांची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१. मागील सप्ताहामध्ये उल्हासनगर शहरातील चार प्रभाग समिती कार्यक्षेत्रात १५ इमारती या अतिधोकादायक आढळून आल्याने रिकाम्या करण्यासाठी नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.
२. प्र.स २ चे कार्यक्षेत्रात प्लाझा मार्केट, प्र.स ३ च्या कार्यक्षेत्रात साई आरकेड अपार्टमेंट, संजय सरीन बॅ.क्र १२८३, प्र.स ४ चे कार्यक्षेत्रात स्वामी शांतीप्रकाश अपार्टमेंट, श्रीराम कॉम्प्लेक्स व जय वैष्णोदेवी अशा एकूण ६ इमारती इमारती रिकाम्या करुन घेण्यात आलेल्या आहेत.
३. उल्हासनगर शहरातील प्र.स १ येथील साईशक्ती अपार्टमेंट, प्र.स २ येथील बालाजी अपार्टमेंट, प्र.स ३ येथील राहुल रेसिडेन्सी व प्र.स ४ येथील प्रथमेश अपार्टमेंट या चार अतिधोकादायक इमारती महापालिकेमार्फत निष्कासीत करण्यास या सप्ताहात प्रारंभ करण्यात येणार आहे.
४. मोहिनी पॅलेस ही इमारत कोसळून दुर्घटना झाल्याने इमारतीचा विकासक मनोज लाहोरी याचेविरुध्द उल्हासनगर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
५. सर्व सहायक आयुक्तांमार्फत त्यांचे कार्यक्षेत्रात विस्थापीत होणा-या नागरिकांसाठी ठिकाणे निश्चित करण्यात आलेली आहेत. महापालिकेच्या शाळा व विद्यालये यासाठी निश्चित करण्यात आलेली आहेत.
६. शहरातील ज्या इमारतींचे आयुर्मान १० वर्षापेक्षा जास्त झालेले आहे अशा १३०० इमारतींना इमारतींचे संरचनात्मक परिक्षण करणेसाठी शहर अभियंत्यांमार्फत नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत.
७. शहरातील नागरिकांना इमारतींचे संरचनात्मक परिक्षण करणेसाठी सुलभ् व्हावे यासाठी महापालिकेमार्फत संरचनात्मक अभियंत्यांचे पॅनेल तयार करणेचे काम प्रगतीपथावर असून या सप्ताहात संरचनात्मक अभियंत्यांचे पॅनेल तयार करुन नागरिकांच्या माहितीसाठी त्यांची यादी प्रसिध्द करण्यात येईल.
८. शहरातील ज्या इमारतींना महापालिकेतर्फे नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत अशा सर्व इमारतधारकांना त्यांच्या इमारतींचे तातडीने तपासणी करुन घेणेसाठी आवाहन करण्यात येत आहे. सदरहु इमारातीमधील रहिवाश्यांनी कोणत्याही Qualified Structural Engineer मार्फत् इमारतीची तपासणी करुन घ्यावी. तपासणीमध्ये शिफारस केल्याप्रमाणे इमारतीची दुरुस्ती करुन झाल्यानंतर पुन्हा अभियंत्यामार्फत् इमारत तपासून इमारत सुसिथतीत असल्याबाबतचा अहवाल सादर करावा. तोपर्यंत इमारत रिक्त ठेऊन त्यामध्ये रहिवास वापर होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. इमारतधारकांनी सदरची कार्यवाही न केल्यास महापालिकेमार्फत कठोर कारवाई करण्यात येणार आहे.
९. इमारतीच्या आर. सी. सी. फ्रेम, कॉलम, बीम, स्लॅब इत्यादीच्या रचनेत बदल होत असल्याचे आढळल्यास उदा.
   - इमारतीचे कॉलम झुकल्यासारखे दिसून आल्यास......
   - इमारतीचे बीम झुकल्यासारखे दिसून आल्यास......



Scanned with CamScanner

- इमारतीची स्लॅब झुकल्यासारखे दिसून आल्यास......
- इमारतीच्या स्लॅबच्या सळया गंजून व प्लास्टर निखळून सळया बाहेर निघाल्याचे दिसून आल्यास....

१०. इमारतीच्या तळमजल्याचा भाग खचल्यासारखा दिसून आल्यास.....

११. इमारतीच्या कॉलमधील भेगा वाढत असल्यास दिसून आल्यास.....

१२. इमरतीच्या कॉलममधील कॉंक्रीट पडत असल्याचे दिसून आल्यास......

१३. इमारतीच्या कॉलमचा भाग फुगल्यासारखा दिसल्यास.....

१४. इमारतीच्या आर. सी. सी. चेंबर्स (कॉलम, बीम) व विटांची भिंती यातील साधा/भेगा वाढत असल्यास.....

१५. स्लॅबचे किंवा बीमचे तळमजल्याचे कॉंक्रीट पडत असल्यास.....

१६. इमारतीच्या गिलाव्यामध्ये (प्लास्टर) मोठया प्रमाणात भेगा असल्यास......

१७. इमारतीच्या काही भागात विशिष्ट आवाज होत असल्यास......

१८. इमारतीच्या स्लॅब, बीम, कॉलमच्या भेगामुळे लोखंडी सळयांचा आकार गंजल्यामुळे कमी झालेला असल्यास......

वरील प्रकारची लक्षणे आपल्या इमारतीत आढळून आल्यास इमारत तात्काळ रिकामी करुन उल्हासनगर महानगरपालिकेच्या २४X७ कार्यरत असलेल्या आपत्कालीन व्यवस्थापन कक्षाच्या ०२५१-२७२०१४३, २७२०१४९ अथवा टोल फ्री क्रमांक १८००२३३११०१ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

दिनांक १५ जून, २०२१

१५/६/२०२१

(डॉ.राजा दयानिधी, भा.प्र.से.)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका



Scanned with CamScanner